| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **प्रसिद्धिपत्रक**<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६<br>फोन नं. ०२०-२६६८५००० | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |

जा.क्र./पोउआ/वाह/ १८०७/२०२५ पुणे दिनांक - ०८/३/२०२५

पुणे शहरातील बाणेर वाहतूक विभागांतर्गत हॉटेल महाबळेश्वर चौक येथे मेट्रो स्टेशनचे काम चालू करावयाचे असल्याने वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टी.आर.ए- २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, बाणेर वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. सदर ठिकाणी यापूर्वी काही पार्किंग संदर्भातील आदेश असतील ते रद्द करण्यात येत आहे.

**बाणेर वाहतुक विभाग पुणे अंतर्गत हॉटेल महाबळेश्वर चौक,विघापीठ, पाषाण रोड येथील वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी वाहतुकी मध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.**

- **बाणेर पाषाण लिंक रोड कडून विद्यापीठकडे जाण्याकरीता डावीकडे वळण घेवून ४५ आयकॉन आय.टी.कंपनी समोरून यु टर्न करून हॉटेल महाबळेश्वर चौकातून विद्यापीठ मार्गे इच्छितस्थळी जावे.**
- **बाणेर गावाकडून बाणेर पाषाण लिंक रोड येथे जाण्याकरीता माऊली पेट्रोलपंपाकडून युटर्न करून पुन्हा महाबळेश्वर हॉटेल चौकामध्ये येवून डावीकडे वळूण बाणेर पाषाण लिंक रोड मार्गे इच्छितस्थळी जावे.**

पोलीस उपआयुक्त वाहतुक विभाग, पुणे.

**(अमोल झेंडे )**
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक, पुणे शहर

प्रति,

**१) जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- **२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक,** पुणे शहर.

**३) पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **प्रभारी अधिकारी कोंढवा** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

**५) पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.
सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

**६) पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.